Vol 4 Issue 8 Sept 2014

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Volume-4 | Issue-8 | Sept-2014
Available online at www.isrj.net

# *लोकसभा निवडणूक 2014 : जनादेशाचा अन्वयार्थ*

*अनंत आवटी*

प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, श्री.व्यंकटेश महाविद्यालय , देऊळगावराजा जि.बुलडाणा .

***सारांश*** :- 2014 च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीवर अनेक घटकांचा प्रभाव पडल्याचे निदर्शनास येते. घोटाळे किंवा भ्रष्टाचार काँग्रेस आघाडीच्या पराभवाला कारणीभूत ठरले. या मुद्दयामध्ये तथ्य असले तरी कोणताही एकच एक मुद्दा या पराभवास कारणीभूत नाही, तर तो अनेकानेक बाबींचा एकत्रित परिपाक आहे, हे निश्चित.

## *प्रस्तावना :-*

2014 च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूक निकालाने अनेक राजकीय विश्लेषक चांगलेच अचंबित झाले असून भाजपाविरोधकांची कित्येक रात्रीची झोप उडाली आहे. हा विजय नरेंद्र मोदी आणि भाजपासाठी सुवर्णक्षण असून विरोधकांसाठी तो राजकीय भूकंपापेक्षा कमी नाही. या निकालाने अनेक राजकीय भाकित खोटे ठरविले जसे की, सध्याचे युग आघाडी सरकारचे असून 1989 नंतर कोणत्याही एका राजकीय पक्षाला स्पष्ट बहूमत मिळणार नाही ही एक राजकीय विश्लेषकांची धारणा हया निकालाने ध्वस्त केली आहे.

## *भ्रष्टाचाराची प्रकरणे आणि आंदोलने :-*

2009 साली लोकसभेच्या 206 जागा मिळाल्यानंतर काँग्रेसला कधीही सत्तेपासून रोखू शकत नाही असा काँग्रेसच्या काही नेत्यांचा भ्रम झाला होता. 2013 मध्ये झालेल्या चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये नव्याने स्थापन झालेल्या आम आदमी पक्षाकडून दिल्लीत झालेला काँग्रेसचा पराभव आणि राजस्थानमध्ये उडालेली धुळधाण हे काँग्रेसचे पराजय म्हणजे काँग्रेसविरोधी लाटेची सुरुवात होते. काँग्रेस वापरत असलेला आम आदमी हा शब्दप्रयोग आम आदमी पार्टीने सुरु केला आणि तो शब्द वापरण्याची देखील काँग्रेस पक्षाला अडचण झाली![1] यु.पी.ए-2 च्या काळात टू जी स्पेक्ट्रम, राष्ट्रकुल खेळ इत्यादी घोटाळयांची चर्चा प्रसारमाध्यमातून सुरू झाली, भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे सातत्याने मीडियामधून लोकांसमोर येत होती. काँग्रेसने अन्न सुरक्षा विधेयक, माहिती अधिकार कायदा, लोकपाल विधेयक अशा माध्यमातून जनतेला सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न केला. पण सतत उघड होणाऱ्या घोटाळयांनी याकडे दुर्लक्ष झाले. या घोटाळयांमुळे वृत्तपत्र, मिडिया आणि विशेषतः सोशल मिडिया यांच्यामुळे सरकारविरोधी मोठी भावना तयार झाली. मंत्री भ्रष्ट आहेत यापेक्षा सरकार आणि पक्ष त्यांच्यावर कोणतीही कारवाई करत नाही यातून जनतेला गेलेला संदेश अतिशय वाईट होता. एका बाजूला भ्रष्टाचाराची प्रकरणे आणि दुसऱ्या बाजूला आंदोलने यामुळे सरकार व काँग्रेस पक्ष दोन्ही गोंधळून गेले. 2011 साली अण्णा हजारेंच्या आंदोलनाने सरकारच्या विरोधात मानसिकता निर्माण केली. अण्णांना व काळया पैशाविरोधात आंदोलन करणाऱ्या रामदेव बाबांना अटक करून यूपीए सरकारने आपली अपरिपक्वता दाखवून दिली. अण्णांच्या आंदोलनानंतर निर्भया प्रकरणाने यूपीए सरकारला आणखी एक जोरदार धक्का दिला. या प्रकरणामुळे झालेल्या असंतोषाच्या उद्रेकातून काँग्रेसच्या पीछेहाटीला आणखी हातभार लागला. अशा निराशाजनक वातावरणात यूपीए सरकार लोकांच्या मनातून उतरत गेले. त्याचा प्रत्यक्ष परिणाम 2014 साली दिसून आला, तरी या पराभवाची बीजे 2010 पासूनच रोवली गेली होती. जसे केजरीवाल यांनी भ्रष्टाचाराविरोधात केवळ आवाज उठविला नाही तर आम आदमीच्या हितासाठी राजकीय सुधारणेचे वातावरण बनविले. भाजपने लोकसभा निवडणुकीत भ्रष्टाचाराचा मुद्दा उचलून धरला. भलेही त्या मुद्दयाचे बिजारोपण केजरीवाल यांनी केले पण भाजपने हा मुद्दा मोदींकडून वदवून त्यांना जननायकाचे रुप प्राप्त करुन दिले. अण्णा हजारे, केजरीवाल यांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाला मोदींनी क्रांतीची रुप प्राप्त करुन दिले. कुशासन, वाढता भ्रष्टाचार आणि या विरोधात कोणतीही उचलली नसलेली पावले यामुळे काँग्रेसचा पराभव अटळ बनला. वास्तविक भ्रष्टाचाराचा मुद्दा हा विरोधकांकडे स्वातंत्र्यापासून होता. पण गेल्या दहा वर्षांत भ्रष्टाचाराने परिसीमाच गाठली. सरकारची प्रतिमा, आरोप झालेल्या मंत्र्यांना वाचविण्यासाठी सरकारची भूमिका, सर्वोच्च न्यायालयाची कोळसा घोटाळयावरील टिप्पणी, विरोधी पक्षाची प्रचंड टिका, प्रसार

माध्यमांची भूमिका या सर्वांवर उपाय शोधण्यात काँग्रेस अपयशी ठरली.

घोटाळे किंवा भ्रष्टाचार काँग्रेसच्या गच्छंतीला कारणीभूत ठरले. या मुद्दयांमध्ये तथ्य असले तरी कोणताही एकच एक मुद्दा हा काँग्रेस आघाडीच्या पराभवास कारणीभूत नाही, तर तो अनेकानेक बाबींचा एकत्रित परिपाक आहे, हे निश्चित.[2]

### उद्योग जगताचा पाठिंबा :-

2004 च्या यु.पी.ए.-1 सरकारचे कामकाज ठिकठाक चालल्याने 2009च्या निवडणुकीच्यावेळी लोकांनी सरकारच्या त्रुटींकडे दुर्लक्ष केले व यु.पी.ए.ला पुन्हा सत्ता स्थापण्याची संधी दिली आणि सर्वसामान्य जनतेपासून कोसो दूर गेलेल्या भाजपला जनतेने दुसऱ्यांदा नाकारले. पण जेव्हा युपीए-2 च्या कार्यकाळात प्रत्येक आघाडींवर सरकार अपयशी ठरायला लागले. सरकारचे नेतृत्व अपयशी ठरायला लागले. त्यामुळे जनतेला एका मजबूत नेत्याची उणिव भासायला लागली. तेव्हा भाजपने नरेंद्र मोदींना पुढे आणले. गत तीन वर्षापासून रतन टाटा ते मुकेश अंबानी यांच्या सारखे कार्पोरेट जगतातील सर्व दिग्गज नरेंद्र मोदी यांच्यात भविष्यात पंतप्रधानाचे गुण बघत होते. तर काँग्रेस पक्षातील नेते ते गुण राहूल गांधी यांच्यात बघत होते.

यूपीए-2 च्या काळात आर्थिक सुधारणांचा वेग घसरला हे सत्य असले तरी काही चांगल्या बाबी लोकांच्या भल्याच्या नक्कीच झाल्या. पण राहुल यांना ठोसपणानं मांडता आल्या नाहीत. उद्योग जगत उघडपणाने मोदींची बाजू घेताना दिसले. माध्यमांनी मोदींना झुकते माप दिले. करिष्मा दाखवणारा नेता जात, वर्गापलीकडे जाऊन लोकभावनेला आवाहन करतो, सोबत घेऊन जातो. केवळ मदतीची, खैरातीची आश्वासने देण्यापेक्षा "अच्छे दिन आनेवाले है" असं वातावरण निर्माण करतो हे पोषक ठरले. निवडणुकीच्या मैदानात समोरचा नेता काही घडवून दाखवतो, असा विश्वास वाटण्याला महत्त्व असते. भारतात युवांची संख्या जास्त असल्याने तरुणांजवळ स्वप्न, आकांक्षा आणि भविष्यातील आशंकासुध्दा आहे. नरेंद्र मोदी यांनी केवळ स्वप्न रंगविली नाही तर सुखाचे दिवस येणार आहेत हा विश्वास दिला.

### नेतृत्वाचा प्रभाव :-

नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व हे भाजपाच्या विजयाचे एक महत्त्वपूर्ण कारण ठरले आहे. मोदींनी काँग्रेसविरोधी वातावरणाला सार्वमतात परावर्तित केले. एका बाजूने आपल्या वागण्या.बोलण्यातून आत्मविश्वास दाखविणारे मोदींचे नेतृत्व आणि दुसऱ्या बाजूने शैथिल्य आलेले, पूर्णपणाने हताश, गलितगात्र झालेले मनमोहनसिंगांचे सरकार तसेच कोणतीही जबाबदारी न घेता पण शेरेबाजी करीत नामानिराळे राहणारे राहुल गांधी यांचे नेतृत्व यांच्या तुलनेने थेट विषयाला भिडणारे, लोकांशी प्रभावी संवाद साधणारे आणि जबाबदारी घेऊन काम करण्याचा दाखला देणारे मोदी या दोघांत लोकांनी मोदींची निवड केली. 'लेस् ऑफ गव्हर्नमेंट, मोअर ऑफ गव्हर्नन्स' सारखी सखोल अर्थपूर्ण सूत्रं मांडत, सर्वांना बरोबर घेण्याची मोदींनी भाषा केली. संरक्षण, परराष्ट्र धोरणापासून बेरोजगारी, शिक्षणापर्यंत . सर्व क्षेत्रांबाबतची समग्र दृष्टीकोन मांडला. मोदींनी लोकसभा निवडणुकीत 'विकास आणि सुशासनाचा' मुख्य मुद्दा मांडला तसेच भारतीय राजकारणात नव्या संकल्पना मांडल्या. मोदींना त्यांच्या तोडीचा प्रतिस्पर्धी उभा करण्यात काँग्रेस पक्ष अपयशी ठरला.

### विकासाचे राजकारण :-

हिंदी भाषिक तसेच आसाम आणि ओडिशा या राज्यातून गुजरातेत रोजगारासाठी मजुरांचा ओघ येतो. गुजरातेत काम करणाऱ्या या कामगारांनी आपल्या राज्यात गेल्यानंतर गुजरातमधील विकासाच्या गोष्टी सांगण्यास सुरुवात केली.[3] त्यामुळे गरीब जनतेला त्या ऐकलेल्या वृत्तांतही आशेचा किरण दिसला. मोदींच्या विरोधकांनी गुजरातच्या विकासाला दंतकथा ठरविण्याचा केलेला प्रयत्न त्यांना अतिशय महागात पडला. जनतेला या टीकेतील फोलपणा लक्षात आल्याने मोदी विरोधकांचा पराभव झाला. आपले टीकाकार आणि विरोधक यांनी चर्चेत आणलेले सगळे मुद्दे मोदींनी जणू अंगावर घेतले. ही निवडणूक मोदी विरुद्ध इतर सगळे अशी झाली. जवळपास तीन लाख किलोमीटरचा प्रवास, प्रचंड सभा, चाय पे चर्चा, त्रिमिती सभा यासारखे कल्पक कार्यक्रम आणि इतके सारे स्वतःचा मुख्यमंत्रिपदाचा कार्यभार सांभाळून करताना मोदींनी जी इर्ष्या आणि कष्ट करण्याची जबरदस्त वृत्ती दाखवली, त्याला अलीकडच्या काळातल्या राजकारणात तोड नाही.[4]

### अस्थिरतेला कंटाळलेली जनता :-

गेल्या तीस वर्षात जनता केंद्र सरकारातील अस्थिरतेला कंटाळली होती. 1980 मध्ये जनतेने इंदीरा गांधींना स्थिरतेसाठी पूर्ण बहूमत दिले. 1984 मध्ये इंदिरा गांधीची हत्या आणि वेगळया खलिस्तानच्या आंदोलनामुळे लोकांच्या मनात अस्थिरतेची भिती निर्माण झाली आणि त्यांनी राजीव गांधीना पूर्ण बहुमत मिळवून दिले. त्यांना केंद्रांत अस्थिरता नको होती. मोदींच्या विजयामागेसुध्दा ते एक कारण आहे. त्यांना एवढा निर्णायक जनादेश मिळाला आहे की पाच वर्षानंतर त्यांच्याजवळ हा बहाणा नसेल की आघाडी सरकारच्या असहाय्यतेमूळे त्यांनी आश्वासने पूर्ण केले नाही. आघाडीच्या राजकारणालाही देश कंटाळला आहे. त्यामुळे पुन्हा आघाडया आणि मग बिघाडया, या समीकरणालाही देशातील मतदारांनी सोडचिठ्ठी दिली आहे. मोदींनी सुशासनाचे आश्वासन पाळले नाही तर भविष्यात तीच अवस्था भाजपची असेल जी आज काँग्रेसची आहे.[5]

### जनतेची बदलेली मानसिकता :-

स्वातंत्र्यानंतर 67 वर्षात 10 वर्षे वगळता कॉंग्रेसचीच सत्ता होती. भारतातील खराब रस्ते, पाणी टंचाई, भारनियमन, भ्रष्टाचार यास कॉंग्रेस जबाबदार आहे अशी मानसिकता लोकांची होती. मोदींच्या विजयाचे रहस्य मुख्यत्वे लोकांच्या बदललेल्या मानसिकतेत आहे. ही मानसिकता ओळखून भाजपने केलेला प्रचार यशस्वी ठरला.

भारतीय जनता पक्षाची पारंपरिक 'कट्टर हिंदुत्ववादी' प्रतिमा मोदींच्या प्रचारतंत्रामुळे हळुहळू बदलत गेली. याचे श्रेयही मोदींच्या प्रचारतंत्रालाच द्यावे लागेल. एक आशादायी, सर्वसमावेशक आणि संयमी प्रतिमा मोदींच्या भाषणातून वेळोवेळी जनतेसमोर आली. मध्यमवर्गाने मोदी तसेच 'एनडीए'वर विश्वास दाखविला. 'ओपीनियन मेकर' असणारा मध्यमवर्ग स्वतःच मतदानासाठी उदास असताना यंदा मोठया प्रमाणावर (सुमारे 66 टक्के) मतदान झाले. मतदारांना मोदींमध्ये अपेक्षा दिसल्या. विश्वासाने भारलेल्या मोदींच्या बॉडी लॅंग्वेजमधून त्या चेतविल्या गेल्या. अच्छे दिन आने वाले है... ही जाहिरात तर त्याच अपेक्षांना अधोरेखित करीत होते. ही जाहिरात इन्स्टंट हिट होण्यामागेसुद्धा याच अपेक्षांचे प्रतिबिंब होते.[6]

कॉंग्रेसविरोधी अनेक मतदारांनी भाजपला नव्हे, तर मोदींना मत दिले आहे. प. बंगाल, तमिळनाडू येथील भाजपच्या मतांतील वाढ, जात.धर्म यावर आधारित पारंपरिक समीकरणांचा उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्र या राज्यांत घटलेला प्रभाव, मध्यमवर्गातील तरुणांमधील आकर्षण हा मोदींच्या पंतप्रधानपदाला दिलेला प्रतिसाद आहे. भाजपच्या मतांची टक्केवारी त्यामुळे वाढली असली, तरी मोदींच्या आकर्षणामुळे पक्षाकडे वळलेला हा मताधार ही तात्कालिक घटना आहे. या सर्व प्रक्रियेला गती देणारे घटक. म्हणजे केंद्रातील सरकार तसेच राहुल गांधींच्या नेतृत्वाविषयीचा कमालीचा असंतोष हेही तात्कालिक घटक आहेत.[7]

### जबरदस्त प्रचारतंत्र :-

मोदींच्या विजयामागे अनेक कारणे आणि घटक आहेत सुनियोजित पध्दतीने उभारलेली त्यांची लार्जर दॅन लाईफची प्रतिमा आणि त्याची जबरदस्त मार्केटिंग भूमिका सर्वांत मोठी आहे. एक कडक, प्रभावी आणि यशस्वी प्रशासक आणि विकास पुरुषाची प्रतिमा निर्माण करण्यात भाजपाने यश मिळविले. 2011 पासून कॉंग्रेस विरोधात सर्व प्रसारमाध्यमांनी प्रचार करण्यास सुरुवात केली. भाजपने प्रसारमाध्यमे आणि सोशल मीडियाचा वापर केला. तसाच तो वापर इतरांनीही करायचा प्रयत्न केला. पण त्यांना यश आले नाही. मोदींना ते आले, कारण मोदींनी जे मुद्दे आणि विषय प्रचारात आणले ते सगळेच लोकांना भावले. त्यांच्यावर प्रचंड टीका झाली, व्यक्तिगत आरोप झाले. पण या सगळयाचा उलटाच परिणाम झाला. प्रसारमाध्यमे आणि सोशल मीडियाच्या वापरामुळे मोदींचा आजच्या काळातल्या तरुण मतदारांशी संवाद होऊ लागला. आणि तो स्वतः तरुण असणाऱ्या राहुल गांधी यांच्यापेक्षा प्रभावी ठरला. या अर्थाने, हा हजारो कोटी रुपयांच्या विशाल प्रचारतंत्राचा विजय आहे. पण तरीही मोदींच्या विजयाचे हे एकमेव वा प्रमुख कारण नाही. फार तर विजयाला सहायभूत झालेला तो एक महत्त्वाचा घटक म्हणता येईल.[8] कॉंग्रेसच्या नाकर्तेपणाला विजयात परावर्तीत करण्यासाठी भाजपने अण्णा हजारे, अरविंद केजरीवाल यांच्या आंदोलनापासून ते प्रसार माध्यमांपर्यंत प्रत्येक गोष्टींचा त्यांनी कुशलतेने वापर केला. मोदींनी आपल्या आक्रमक शैलीत त्याचा पुरेपूर लाभ उठवला.[9]

### महागाई :-

कॉंग्रेसने दारिद्रयरेषेखालील 27 कोटी जनतेसाठी अनेक योजना राबविल्या असल्या तरी त्या परिघाबाहेरील गरीब, मध्यम आणि उच्च मध्यम वर्गाच्याही अनेक आकांक्षा आहेत, याकडे कॉंग्रेसचे दुर्लक्ष झाले. आम्ही गरिबांना स्वस्त धान्य देतो. असे कॉंग्रेस सांगत असतांना आर्थिक विकासातून रोजगारांच्या अधिकाधिक संधी निर्माण करण्यावर नरेंद्र मोदी यांनी भर दिला. या निवडणूकीत महागाई आणि भ्रष्टाचार हे मुद्दे महत्त्वाचे होते.[10]

निव्वळ हिंदुत्वामुळे मोदी विजयी झालेले नाहीत. देशातील आर्थिक पेचप्रसंगावर आपल्याकडे उत्तर आहे, हा मोदींचा ठाम पवित्रा अधिक निर्णायक ठरला. कॉंग्रेस किंवा बाकीचे विरोधक तितकेच ठणकावून बोलू शकले नाहीत. कॉंग्रेस याबाबत अत्यंत ढिसाळ आणि गाफील राहिली. तर बाकीच्या बिगर-भाजप पक्षांनी आपण एकटयाने देशाची सूत्रे हाती घेऊ शकू, अशी कल्पनादेखील केली नाही. तसेच दिवसागणिक वाढणाऱ्या महागाईनेही लोकांच्या मनातील राग वाढवत गेला. सरकारमधील काही मंडळींनी गरिबाची थट्टा करणारी विधाने करुन आगीत तेल ओतण्याचा प्रयत्न केला.

### भाजपच्या मतांमध्ये वाढ :-

2009 च्या सार्वत्रिक निवडणुकांत कॉंग्रेसला 206 आणि भाजपला 116 जागा मिळाल्या होत्या. म्हणजे या दोन्ही राष्ट्रीय पक्षाला एकूण 322 जागा मिळाल्या. 2014 च्या निवडणुकीत भाजपला 282 आणि कॉंग्रेसला 44 जागा मिळाल्या. त्यांची बेरीज 326 होते. म्हणजेच पाच वर्षाआधी 221 जागा इतर पक्षांना मिळाल्या. यावेळेस 217 मिळाल्या. 2009 मध्ये कॉंग्रेसला 28.60% आणि भाजपला 18.82% मते प्राप्त झाली. त्यांची बेरीज 47.42% होती. यावेळेस भाजपला 31% आणि कॉंग्रेसला 19.3% मते मिळाली. त्याची एकूण बेरीज 50.3% होते. म्हणजेच दोन्ही राष्ट्रीय पक्षांची एकूण मतांमध्ये 2.88% वाढ होऊन 4 जागा वाढल्या. कॉंग्रेसच्या मताची टक्केवारी 9% ने कमी झाली व भाजपची मताची टक्केवारी 13% ने वाढली. लोकसभेच्या या आधीच्या सर्व सार्वत्रिक

निवडणुकांमध्ये 40% पेक्षा कमी मतांवर बहुमत मिळाले नाही पण भाजपला केवळ 31% मते मिळून पूर्ण बहुमत प्राप्त झाले आहे. या निवडणुकीत काही गोष्टी स्पष्ट आहे जसे की भाजपच्या मतात वाढ होऊन मतांचे जागांत रुपांतर त्यास यश प्राप्त झाले. प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व फारसे काही कमी झाले नाही.

### *भाजपला व्यापक जनाधारप्राप्त :-*

एक गैरसमज होता, की भाजप वा मोदींना केवळ हिंदी भाषिक राज्यांमध्येच पाठबळ आहे. या वेळी महाराष्ट्र, कर्नाटक या राज्यांमध्ये मोदींना जे प्रचंड जनसमर्थन मिळाले, ते अभूतपूर्व आहे. इतकेच नव्हे तर हिमाचल प्रदेश, हरियाणा, आसाम या राज्यांमध्ये भाजपला व्यापक जनाधार मिळाला आहे.

गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि झारखंड या राज्यांमध्ये भाजपने जबरदस्त प्रदर्शन केले. उत्तरप्रदेश, बिहार आणि महाराष्ट्रासारख्या मोठया राज्यांमध्ये त्यांच्या मतांमध्ये प्रचंड वाढ झाली, तेथील इतर पक्षांचा सफाया झाला. आसाममध्ये मात्र त्यास अनपेक्षित यश मिळाले. बंगाल, ओडिशा, तमिळनाडूमध्ये भाजपचे यश मर्यादित आहे. तिथल्या राज्यस्तरावरच्या नेत्यांनी आपापले प्रांत राखलेले आहेत, पण त्या ठिकाणीही भाजपचा शिरकाव झालेला आहे हे निश्चित. विशेषतः ह्या राज्यांमध्ये तिथल्या कोणत्याही स्थानिक पक्षांबरोबर समझोता नसताना स्वतःच्या बळावर भाजपला या जागा मिळाल्या आहेत, हे विशेष. तमिळनाडूमध्ये डीएमके व काँग्रेसला एकही जागा मिळालेली नाही आणि भाजपला एक (का होईना) जागा आहे, हे महत्त्वाचे आहे. केरळमध्ये भाजपला जागा मिळालेली नसली, तरी या वेळच्या मतांची टक्केवारी खूपच वाढलेली आहे. केरळ, सिक्कीम, लक्षद्वीप, पुदुच्चेरी, मिझोराम, त्रिपुरा, मणिपूर, नागालँड यासारख्या काही राज्यांचा अपवाद वगळता आज भाजप सर्व देशात पोहोचलेला आहे. प्रादेशिक पक्षांच्या जागांना तो कमी शकला नाही. तामिळनाडू, केरळ, पं. बंगाल, ओडीसा या राज्यात मोदी लाटेचा परिणाम होता. पण त्यामुळे त्यांच्या जागा मात्र वाढल्या नाहीत. याउलट गुजरात, राजस्थान, दिल्ली, हिमाचल प्रदेश, गोवा, तमिळनाडू, ओडिशा, झारखंड, जम्मू.काश्मीर यासारख्या अनेक प्रमुख राज्यांमधून काँग्रेसला एकही जागा मिळालेली नाही, हे बघण्यासारखे आहे. भाजपचा प्रभाव देशभर वाढत असताना अनेक ठिकाणी काँग्रेसचे अस्तित्व धोक्यात आले आहे. आणि काँग्रेससह सर्व डावे पक्ष, बसपसारखे पक्ष यांना आपल्या स्वतःच्या अस्तित्वाचा विचार करायला लागणार आहे. हाच 2014 च्या निवडणुकीचा धडा आहे.[11]

### *प्रादेशिक सरकारची कामगिरी :-*

काँग्रेसच्या अपयशामागे व भाजपच्या यशामागे तेथील सरकारची कामगिरीसुध्दा कारणीभूत ठरली. जसे महाराष्ट्रात काँग्रेस.राष्ट्रवादी सरकारचे अपयश, मध्यप्रदेश आणि छत्तीसगडमधील भाजप सरकारचे भरीव कार्य ही कारणे भाजपच्या यशामागे आहे. उत्तर प्रदेशात भाजपला मिळालेल्या यशाचे श्रेय अमित शाह यांची रणनिती व निवडणुक व्यवस्थापन तसेच समाजवादी पार्टी व बहुजन समाज पार्टी यांच्यावरुन लोकांचा ढळलेला विश्वास यांना द्यावे लागेल. गुजराथचा मुख्यमंत्री हा पंतप्रधानपदाचा उमेदवार यामुळे गुजराथमध्ये 100 प्रतिशत यश प्राप्त झाले. याउलट काँग्रेसचे सरकार असणाऱ्या महाराष्ट्र, कर्नाटक, आसाम आणि हरियाणा या राज्यांत काँग्रेसचा दारुण पराभव झाला.

काँग्रेसचा जनाधार आटत गेला याचे कारण राज्याराज्यातील नेतृत्व कधी उभं राहूच दिलं नाही यातही आहे. उत्तर भारतात पक्ष घसरणीला लागून दोन दशके उलटली तरी संघटना बांधणीकडं लक्ष दिलं जात नाही.[12]

### *जनाधारप्राप्त पक्षांशी आघाडी :-*

भाजपने योग्य राजकीय पक्षांशी युती केल्याने सुध्दा यश मिळाले. त्यामुळेच आंध्रप्रदेश सारख्या राज्यातही त्यास यश प्राप्त झाले. काँग्रेसची पूर्ण रणनिती चुकीची होती आणि त्यात काही ताळमेळ नव्हता. काही गोष्टी तर एकदम स्पष्ट होत्या. आंध्रप्रदेशात मागील निवडणुकांत काँग्रेसला 33 जागा मिळाल्या. पण तेलंगणा विभाजनानंतर पूर्ण वातावरण बदलले. त्यांच्या मुख्यमंत्र्यानेसुध्दा नवीन पक्ष स्थापन केला. तामिळनाडूत युती असल्याने काँग्रेसला 8 जागा मिळाल्या पण यावेळेस युती नसल्याने त्याची पुनरावृत्ती होऊ शकली नाही. हिच गोष्ट प. बंगालच्या 6 जागा संदर्भात होती. राजस्थानच्या विधानसभा निवडणुकांनतर आणि दिल्लीतील 7 जागांची शक्यताही धुळीस मिळाल्याची चिन्हे दिसून आली.

### *तरुण मतदार व सोशल मिडीयाची भूमिका :-*

तरुण मतदारांनी (18 ते 22 वर्षे वयोगटातील) भाजपला मोठया प्रमाणावर मतदान केल्यामुळे देखील भाजप एवढा मोठा विजय संपादन करू शकला आहे. त्याचे श्रेय नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रियतेला द्यावे लागेल. तरुण वर्गाच्या आशा.आकांक्षांना पूरक आश्वासने म्हणून त्यांची साथ मोदींना मिळाली. ताबडतोब रिझल्ट अथवा काम करण्याची तयारी दाखवणाऱ्या नेत्याला मतदान करण्याची मानसिकता नवमतदारांमध्ये तसेच तरुण वर्गात निर्माण झाल्यामुळे भाजप तसेच मोदींना याचा लाभ झाला. इलेक्ट्रॉनिक मीडिया, सोशल नेटवर्किंग यांचा चलाखीने वापर करून घेण्यात भाजपा यशस्वी झाला. त्यामुळे 11.5 कोटी तरुण मतदार, जे की प्रथमच यंदा मतदान करणार होते, त्यांच्यापर्यंत मोदी पोहोचू शकले. थ्रीडी होलोग्राम, चाय पार्टीसारख्या आयोजनाला 18. 23

वयोगटातील तरुणांना असे नवे उपक्रम खूप आवडले. रोज नव्या गोष्टीच्या शोधात असणाऱ्या तरुण पिढीला वाटले, हा माणूस इनोव्हेशन करू शकतो.[13] नव्या गोष्टी आणू शकतो असे वाटल्याने भाजप काँग्रेसचा प्रचंड पराभव करू शकला. लोकांच्या भाषेत बोलणारे, भारताच्या समस्या समजू शकणारे मोदी तरुणांना भावले. मोदींकडे पाहूनच सामान्य मतदारांनी मतदान केले.

### *निष्कर्ष :-*

काँग्रेसच्या पराभवाच्या 6 मोठया कारणांमध्ये सर्वात मोठे कारण म्हणजे युपीएच्या 10 वर्षांच्या काळातील युपीए सरकारचा नाकर्तेपणा, भ्रष्टाचार आणि महागाई हे आहे. दुसरे मोठे कारण म्हणजे काँग्रेसच्या नेत्यांकडून जनआंदोलनाकडे दुर्लक्ष करणे, तिसरे कारण मोदींना प्रचंड विरोध करुन सर्व मोदी विरोधकांनी त्यांना नायक बनविणे, चौथे कारण म्हणजे निवडणुक प्रचारादम्यान मोदींचा विभिन्न मुद्दयांवर आत्मविश्वासी प्रहार, पाचवे कारण म्हणजे नवमतदारांना आकर्षित करण्यासाठी मोदींव्दारे सोशल मिडियाचा वापर आणि सहावे कारण म्हणजे विरोधी पक्षांच्या मतांची विभागणी. लालकृष्ण अडवाणी आणि अमित शहा या दोघांची सरळ साधी वस्तव्ये लक्षात घेतली तरी या निवडणुकीतील मुद्दे लक्षात येतात. निकाल जाहीर झाले त्या दिवशी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देतांना अडवणींनी भ्रष्टाचार, महागाई, ढिगाळ प्रशासन आणि घराणेशाही ही चार कारणे भाजपच्या यशाची व काँग्रेसच्या पराभवाची सांगितली आहेत. अमित शहा यांनी इंडियन एक्सप्रेसला दिलेल्या मुलाखतीत भाजपच्या यशाला अनेक घटक कारणीभूत असल्याचे म्हटले आहे.

### *संदर्भ सूची :-*


1.पळशीकर, सुहास, काँग्रेसपुढील पेच प्रसंग आणि आव्हाने, दै. महाराष्ट्र टाईम्स संवाद, 25 मे 14
2.परब, विनायक, नो उल्लू बनाविंग!, सा.लोकप्रभा, 18 मे 2014
3.अय्यर, स्वामिनाथन, मोदींच्या यशाला विस्थापित मजुरांचा हातभार, सा.साधना, 7 जून 2014
4.फडके, दिलीप, ऐतिहासिक विजयाचा अन्वयार्थ, दै. लोकसत्ता, 18 मे 2014
5.कुलकर्णी, संतोष, जनतेनेच हाती घेतलेली निवडणूक, दै. महाराष्ट्र टाईम्स, 18 मे 2014
6.कामत, सतिश, काँग्रेसविराधी उठाव, दै. महाराष्ट्र टाईम्स, 18 मे 2014
7.परब, उनि
8.फडके, उनि
9.भटेवरा, सुरेश, नमो लाटेची नियती, दै. महाराष्ट्र टाईम्स, 18 मे 2014
10.साबडे, संजीव महागाई, भ्रष्टाचार हेच महत्त्वाचे मुद्दे, दै. सकाळ, 18 मे 14
11.फडके, उनि
12.पवार, श्रीराम, युवराजांच्या नेतृत्वापुढं प्रश्नचिन्ह!, दै. सकाळ, 18 मे 2014
13.मुखोपाध्याय नीलांजन, नव्या पिढीवर चालवली जादू !, दै. दिव्य मराठी, 17 मे 2014





***अनंत आवटी***
प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, श्री.व्यंकटेश महाविद्यालय , देऊळगावराजा जि.बुलडाणा .

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net